महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीचरोड,अलिबाग.जि.रायगड
Email- deangmcalibag@gmail.com Phone No.02141-299214 www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/कनिष्ठ निवासी /कं.पदभरती/२९३६ /२०२३ दिनांक. ०२.११.२०२३

# जाहिरात

विषय - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथील विविध विषयातील कनिष्ठ निवासी यांची रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे भरण्याबाबत...

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथील रिक्त असलेली विविध विषयातील कनिष्ठ निवासी पदे करार पध्दतीने १२० दिवसांकरिता भरण्याबाबत थेट मुलाखत दर बुधवारी दुपारी ११.०० वा. अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथे घेण्यात येतील. सदरच्या जाहिरातीमधील पदसंख्या बदलण्याबाबतचा अथवा सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठातांनी राखून ठेवला आहे.

तरी इच्छूक उमेदवारांनी शैक्षणिक मुळ कागदपत्रे व साक्षांकित कागदपत्रे घेवून स्वखर्चाने उपस्थित रहावे. सदर पदे भरण्याबाबतचे नियम व अटी प्रचलित शासन निर्णयानुसार राहतील.

| Sr. No. | Post Name | Qualification | Total Post |
|---|---|---|---|
| 1 | Junior Resident | MBBS | 12 |

**A) Junior Resident (Bonded/Contract Basis)**
शैक्षणिक अर्हता- MBBS.
वेतनश्रेणी- ६६००/- अधिक शासकीय अनुज्ञेय भत्ते.

<u>नियम व अटी-</u>

१) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा. तसेच अर्जदारांविरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

२) उमेदवाराची वयोमर्यादा ही राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानांकनानुसार राहील.

३) नियुक्तीनंतर उमेदवारास वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र ३ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

४) सदर रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

५) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणताही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

६) अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

७) अर्जदाराची नियुक्ती संचालनालयाकडून बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपाची असून जर शासनातर्फे निवड मंडळामार्फत/नामनिर्देशनाने/बदली अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कायम स्वरुपाच्या उमेदवारास रुजू करण्यात आलेस अर्जदाराची त्या पदावरिल सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८) उमेदवारास जर काही कारणास्तव राजीनामा (Prior Intimation) द्यावा लागला तर एक महिना अगोदर पूर्व सूचना विभाग प्रमुखांमार्फत या कार्यालयास सादर करावी लागेल.

९) सदर जाहिरात www.gmchalibag.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने आवश्यक कागदपत्रासह दुपारी ११.०० वा. उपस्थित रहावे लागेल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरच्या जाहीरातीमधील पदसंख्या बदलण्याबाबचा अथवा संपूर्ण जाहीरात रद्द करण्याचा अधिकार मा. अधिष्ठातांनी राखून ठेवला आहे. उमेदवारांनी मुलाखतीसाठीचे अर्ज हे १० ते ११ या वेळेत स्वतः उपस्थित राहून भरुन देण्याचे आहेत. मुलाखत हि अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग यांचे कक्षात होईल.

डॉ. पूर्वा पाटील
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
अलिबाग.

DEAN
Government Medical Collage
Alibag-Raigad

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

३. संबंधित विभागप्रमुख,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग.

४. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये महाराष्ट्र राज्य.